सकाळ

जळगाव, शनिवार, १७ सप्टेंबर २०२२ २

महाराष्ट्र

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीची सूचना

जळगाव जिल्ह्यामधील १) एरंडोल तालुक्यातील गिरणा नदीवरील मौजे उत्राण ए.एच.-१, उत्राण ए.एच.-२, हनुमानखेडेशीम भाग १, हनुमानखेडेशीम भाग २, टाकरखेडा-१ व टाकरखेडा-२ तसेच २) यावल तालुक्यातील तापी नदीवरील मौजे पिंप्री, शिरागड व पाथराळे आणि ३) अमळनेर तालुक्यातील तापी नदीवरील मौजे जालोद अशा एकूण १० प्रस्तावित वाळू घाटांची पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीसाठी तीन तालुक्यांतील एकूण दहा वाळू घाटांची जाहीर लोकसुनावणी घेण्याचा प्रस्ताव अतिरिक्त जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडून प्राप्त झालेला आहे.

भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस. ओ.१५३३, दि.१४/०९/२००६ (दिनांक ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टिप्पणी, तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर प्रकल्पांच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टीका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी, तसेच लेखी स्वरूपात नोंदविता येतील. लेखी स्वरूपात सूचना ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात तसेच कार्यालयातील शाखेमध्ये जनसुनावणीच्या अगोदर लेखी किंवा तोंडी आपल्या आवाजात रेकॉर्ड करून ई-मेल :- srojalgaon1@mpcb.gov.in वर सादर करू शकतात किंवा जनसुनावणीच्या वेळी आपले निवेदन सादर करू शकतात.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल ''ए''**
**३रा मजला, जुने बी.जे.मार्केट, जळगाव,**
**जळगाव - ४२५००१. दूरध्वनी क्र.०२५७-२२२१२८८**
**ई-मेल:- srojalgaon1@mpcb.gov.in**

**तसेच तोंडी अथवा लेखी स्वरूपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात.**
**वाळू घाटांची जाहीर लोकसुनावणीची वेळ, तारीख व ठिकाण खालीलप्रमाणे.**

लोकसुनावणीचे ठिकाण :- १) यावल तालुक्याकरिता- तहसील कार्यालय, यावल, ता. यावल, जि.जळगाव.
२) अमळनेर तालुक्याकरिता - उपविभागीय कार्यालय,अमळनेर, ता. अमळनेर, जि. जळगाव
३) एरंडोल तालुक्याकरिता - उपविभागीय कार्यालय, एरंडोल, ता. एरंडोल, जि. जळगाव लोकसुनावणीची तारीख :- दि. १९ - १० -२०२२ लोकसुनावणीची वेळ :- यावल तालुक्याकरिता सकाळी- ११:०० वाजता, अमळनेर तालुक्याकरिता दुपारी २:०० वाजता, एरंडोल तालुक्याकरिता दुपारी ४:०० वाजता.

सदर जाहीर लोकसुनावणीची संबंधी माहिती असलेले दस्ताऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेले असून, कार्यालयीन वेळेमध्ये संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगाव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) उप-विभागीय कार्यालय, अमळनेर / फैजपूर / एरंडोल, जि. जळगाव.
५) तहसील कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल, जि. जळगाव.
६) नगर परिषद, अमळनेर / यावल / एरंडोल, जि. जळगाव.
७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अमळनेर / यावल / एरंडोल, जि. जळगाव.
८) ग्रामपंचायत कार्यालय उत्राण, हनुमानखेडेशीम, टाकरखेडा, ता. एरंडोल, पिंप्री, शिरागड, पाथराळे, ता. यावल, जालोद ता.अमळनेर जि. जळगाव.
९) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल ''ए'', ३ रा मजला, जुने बी.जे. मार्केट, जळगाव, जळगाव - ४२५००१.
१०) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, त्रबंक रोड, आयटीआयजवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
११) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१३) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट वींग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स नागपूर-४४०००१.

सदरील जाहीर लोकसुनावणीबाबतची सूचना ही मा. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या मान्यतेने देण्यात येत आहे.

**सही/-**
**(अजय चव्हाण)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगाव**